# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

लोकमत

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी मोठ्या संख्येने संस्थेचे सभासद उपस्थित होते.

सभेत आमदार दिलीप मोहिते, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे उपाध्यक्ष हिरामण सातकर यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. घटनादुरुस्ती विषयावर आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार राम कांडगे यांनी चर्चेत सहभाग घेऊन मते मांडली. शंकांचे निरसन संस्थेच्या वतीने अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरी सांडभोर यांनी केले. चर्चेत हिरामण सातकर, राजेश कांडगे, अनिल राक्षे, सुरेश टाकळकर, ॲड. रामचंद्र घोलप, अरविंद दौंडकर, राजेंद्र टाकळकर, प्रकाश पाचारणे यांनी सहभाग घेतला. माजी आमदार राम कांडगे, सुरेश गोरे तसेच संचालक उपस्थित होते. मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी अहवालवाचन केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jan 22, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सभा शांततेत

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा रविवारी (दि. १९) संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी मोठ्या संख्येने संस्थेचे सभासद उपस्थित होते.

काळानुरूप संस्थेच्या ध्येयधोरणात बदल करणे गरजेचे असल्याने काही मुद्यांच्या बाबतीत घटनादुरुस्ती करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर या सभेत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. घटनादुरुस्ती विषयावर आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार राम कांडगे यांनी चर्चेत सहभाग घेऊन दुरुस्तीच्या विषयावर आपापली मते मांडली. त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन संस्थेच्या वतीने अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

या चर्चेत हिरामण सातकर, राजेश कांडगे, अनिलबाबा राक्षे, सुरेश टाकळकर, अ‍ॅड. रामचंद्र घोलप, अरविंद दौंडकर, राजेंद्र टाकळकर, प्रकाश पाचारणे यांनी सहभाग घेतला.

संस्थेच्या हितासाठी घटनादुरुस्ती असल्याची भावना बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केली. सभासदांच्या भावनांचा आदर करून बहुमताने घटनादुरुस्ती स्वीकारण्यात आली. अहवाल वाचन संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सभा शांततेत

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा रविवारी (दि. १९) संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी मोठ्या संख्येने संस्थेचे सभासद उपस्थित होते.

काळानुरूप संस्थेच्या ध्येयधोरणात बदल करणे गरजेचे असल्याने काही मुद्द्यांच्या बाबतीत घटनादुरुस्ती करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर या सभेत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. घटनादुरुस्ती विषयावर आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार राम कांडगे यांनी चर्चेत सहभाग घेऊन दुरुस्तीच्या विषयावर आपापली मते मांडली. त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन संस्थेच्या वतीने अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

या चर्चेत हिरामण सातकर, राजेश कांडगे, अनिलबाबा राक्षे, सुरेश टाकळकर, ॲड. रामचंद्र घोलप, अरविंद दौंडकर, राजेंद्र टाकळकर, प्रकाश पाचारणे यांनी सहभाग घेतला.

संस्थेच्या हितासाठी घटनादुरुस्ती असल्याची भावना बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केली. सभासदांच्या भावनांचा आदर करून बहुमताने घटनादुरुस्ती स्वीकारण्यात आली. अहवाल वाचन संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

[redacted]

दै. प्रभात

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा संपन्न

**राजगुरूनगर । प्रतिनिधी**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मोठ्या संख्येने संस्थेचे सभासद उपस्थित होते. काळानुरूप संस्थेच्या ध्येयधोरणात बदल करणे गरजेचे असल्याने काही मुद्यांच्या बाबतीत घटनादुरुस्ती करणे आवश्यक होते. या पार्श्र्वभूमीवर या सभेत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.सभेत विद्यमान आमदार दिलीप मोहितेपाटील तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्याबद्दल तसेच हिरामण सातकर यांची महाराष्ट्र राज्य सहकारी संघावर दुसऱ्यांदा उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. घटनादूरूस्ती विषयावर आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार राम कांडगे यांनी चर्चेत सहभाग घेऊन दुरूस्तीच्या विषयावर आपापली मते मोकळेपणाने मांडली. त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन संस्थेच्या वतीने अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. या चर्चेत हिरामण सातकर, राजेश कांडगे, अनिल(बाबा) राक्षे, सुरेश टाकळकर, ॲड. रामचंद्र घोलप, अरविंद दौंडकर, राजेंद्र टाकळकर, प्रकाश पाचारणे यांनी सहभाग घेतला. संस्थेच्या हितासाठी घटनादुरूस्ती असल्याची भावना बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केली. सभासदांच्या भावनांचा आदर करून बहुमताने घटनादुरूस्ती स्वीकारण्यात आली.या सभेसाठी आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार राम कांडगे, सुरेश गोरे, तसेच संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते. अहवाल वाचन संस्थेचे हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

दै. जनप्रवास

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा संपन्न

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मोठ्या संख्येने संस्थेचे सभासद उपस्थित होते.

काळानुरूप संस्थेच्या ध्येयधोरणात बदल करणे गरजेचे असल्याने काही मुद्यांच्या बाबतीत घटनादुरुस्ती करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर या सभेत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

सभेत विद्यमान आमदार दिलीप मोहिते-पाटील तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्याबद्दल तसेच हिरामण सातकर यांची महाराष्ट्र राज्य सहकारी संघावर दुसऱ्यांदा उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

घटनादूरुस्ती विषयावर आमदार दिलीप मोहिते-पाटील, माजी आमदार राम कांडगे यांनी चर्चेत सहभाग घेऊन दुरुस्तीच्या विषयावर आपापली मते मोकळेपणाने मांडली. त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन संस्थेच्या वतीने अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. या चर्चेत हिरामण सातकर, राजेश कांडगे, अनिल राक्षे, सुरेश टाकळकर, ॲड. रामचंद्र घोलप, अरविंद दौंडकर, राजेंद्र टाकळकर, प्रकाश पाचारणे यांनी सहभाग घेतला. संस्थेच्या हितासाठी घटनादुरुस्ती असल्याची भावना बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केली. सभासदांच्या भावनांचा आदर करून बहुमताने घटनादुरुस्ती स्वीकारण्यात आली.

या सभेसाठी आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी आमदार राम कांडगे, सुरेश गोरे, तसेच संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते. अहवाल वाचन संस्थेचे हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

दै. केसरी

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख